# शंभर पुराव्यासह किरीट सोमय्यांची अंजनगाव पोलिसात तक्रार

**बांगलादेशी रोहिंग्यांचे प्रकरण तापले | अमरावतीसह अकोला, यवतमाळचे फॉरेन्सिक ऑडिट ची मागणी**

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी, ( दि. 6 )** – अमरावतीसह संपूर्ण राज्यात हा बोगस प्रमाणपत्राचा नियोजित घोटाळा सुरू आहे. जन्म प्रमाणपत्रासाठी दोन लाख 23 हजार अर्ज आले. त्यापैकी 99 टक्के मुस्लिम समाजाचे आहेत. राज्यातील 54 शहरात 1 ते 5 हजार अर्ज आले आणि त्यापैकी अधिकतर प्रमाणपत्र त्यांना दिले गेले. विदर्भात अकोला, यवतमाळ, अमरावती येथे मोठ्या प्रमाणात प्रमाणपत्र देण्यात आले. अमरावतीमध्ये 15 हजार प्रमाणपत्र देण्यात आले. त्यामुळे या तीनही जिल्ह्यांचे प्रमाणपत्रासंदर्भात फॉरेंसिक ऑडीट करावे, अशी मागणी आपण मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. अशी माहिती भाजपा नेते तथा माजी खासदार किरीट सोमया यांनी गुरूवारी (दि.6) येथे दिली. भाजप नेते सोमय्या यांनी गुरुवारी अंजनगाव सुर्जी पोलिस



स्टेशनमध्ये बांगलादेशी-रोहिंग्याना बोगस प्रमाणपत्र प्रकरणी 100 पुराव्यासह तक्रार दाखल केली. त्यांनतर ते प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयाने जन्म प्रमाणपत्रासाठी आलेल्या 1484 पैकी शून्य अर्ज फेटाळले. 585 ना सर्टिफिकेट दिले आणि 900 जणांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण केली. या संदर्भात 100 पुरावे आज अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन येथे सुपूर्द केले आहेत, तसेच तक्रार देखील दिली आहे. या संदर्भात लवकरच एफआयआर, गुन्हा दाखल होणार असा आपल्याला विश्वास आहे. येथील मुस्लिमांकडे जन्म प्रमाणपत्र आहे. सर्व कागदपत्रे आहेत. मात्र जे बाहेरून आले आहेत म्हणजेच जे बांगलादेशी आहेत, त्यांचाकडे कागदपत्रेच नाहीत. केवळ आधार कार्डच्या आधारावर बोगस सर्टिफिकेट टीसी लपार क रणहात आल्या. जन्म प्रमाणपत्र देण्यात आली. मी जे 100 पुरावे दिले त्यांच्याशी संबंधित लोकांवर ताबडतोब एफआयआर दाखल करावी. या संपूर्ण प्रकरणांशी तहसील कार्यालयातील काही लोक सहभागी आहेत. ज्यामध्ये ज्याकाही एजेंट आणि वकिलांचा देखील सहभाग आहे. त्यामुळे मी दिलेल्या शंभर पुराव्याचा आधारावरच संपूर्ण 1484 अर्ज तपासाचे, अशी मागणी ही त्यांनी केली. गेल्या महिन्याभरापूर्वी भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मालेगाव नंतर अमरावती जिल्ह्यातील अंजनगावसूर्जी पेथील तहसिलदारांनी बांगलादेशी रोहिंग्यांना जन्म नोंदीचे प्रमाणपत्र दिल्याचा आरोप केला होत त्यामुळे शहरात मोठी खळबळ माजली होती. तालुका प्रशासनासह जिल्हा प्रसासन येथील तहसिलदारांनी आदेश केल ल्या व पेंडिंग असलेल्या वेत्सेस तपासणीसाठी युद्ध पातळीवर कामाला लागले होते. मात्र, गुरूवारी (ता. 6) किर टि सोमय्या यांनी अंजनगावात दाखल होऊन पोलिसात तक्रार दाखल केली असल्याने सबंधित कामकाज करणाऱ्या अधिकार याचे धाबे चांगलेच दणाणले आहे. आता पोलिस तपासाअंती काय समोर येते? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांची चौकशी व्हावी!

जिल्हाधिकारी यांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मी मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांची देखील चौकशी करण्याची मागणी करणार आहे, असे किरीट सोमया यांनी सांगितले. तहसीलदारांना जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे त्यांना याचा देखील जाब द्यावा लागेल, स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीने अद्याप काहीही केलेले नाही, असा आरोपही किरीट सोमय्या यांनी केला.

# मोर्शीतील त्या दोन महिला सावकारांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**- मोर्शीतील दोन महिला सावकाराविरुद्ध मोर्शी पोलिसात सावकार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोर्शी शहरातील अप्पर वर्धा कॉलनी वसाहतीत दोन महिला गेल्या काही दिवसांपासून सावकारी व्यवसाय करत असल्याची तक्रार उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे करण्यात आली होती. त्याद्वारे निबंधक सहकारी संस्थेच्या सहाय यक निबंधक स्वाती गुडधे यांच्या पथकाने अप्परवर्धा वसाहतीत राहणाऱ्या अर्चना झटाले यांच्या घरी धाड टाकली. तर तिवसा येथील सहाय्यक निबंधक प्रीती धामणे यांच्या पथकाने पूजा राजपूत (रा. अप्पर वर्धा कॉलनी, म बोर्शी) या दोन महिलेच्या घरी 10 जानेवारीला धाड टाकण्याची कार्यवाही केली होती. त्यावेळी त्यांच्या घरातून हमीपत्र, 2 लाख 50 हजार रूपये उसनवारी दिल्याबाबतचा नोंद असलेला कागद, व्याजाने पैसे दिले असल्याबाबतची नोंदवही, दुसऱ्या व्यक्तीचे स्वाक्षरी असलेले कोरे धनादेश व कोरा स्टॅम्प पेपर व दस्तऐवज जप्त करण्यात आला होता. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मोर्शी कार्यालयाचे अधिकारी फिर्यादी राजेश भुयार यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी केल्यानंतर दोन्हीही सावकार महिलांना 27 जानेवारीपर्यंत खुलासा सादर करण्यास सांगितले होते. गैरअर्जदार दोन्ही महिलेने 31 जानेवारी रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयात सादर केला. त्यामध्ये दोन्ही महिलांनी अवैध सावकारी केल्याचे दिसून आले. त्यामुळे 5 फेब्रुवारी रोजी मोर्शी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी सावकार महिला अर्चना झटाले व पूजा राजपूत यांच्या विरुद्ध महाराष्ट्र सावकारी अधिनियम 2014 मधील कलम 23,39,42,45 अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

# फळभाज्या, पालेभाज्यांच्या दरात घसरण

### फुलाच्या दरात महागाईची दरवळ अपेक्षित मागणी नाही



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि. 6 )** - बाजारात भाज्यांची आवक वाढली असल्याने दरात मोठी घसरण झाली आहे. फुलबाजारात झेंडू वगळता अन्य सर्व फुलांची आवक जावक कायम आहे. आवक कमी असल्याने झेंडूच्या दरात दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. मागणीच्या तुलनेत भाज्यांची आवक जास्त होत असल्याने सर्व प्रकारच्या फळभाज्या आणि पालेभाज्यांच्या दरात घसरण झाली आहे. किरकोळ बाजारात फळभाज्या वीस रुपये पाव तसेच सर्व पालेभाज्यांची जुडी दहा रुपये या दराने विकली जात आहे. स्थानिक भागांसह परराज्यांतून फळभाज्यांची आवक होत असते. अपेक्षित मागणी नसल्याने आले, लसूण, काकडी, शिमला मिरची आणि मटारच्या दरांत घसरण झाली. बाजारात हिरवी मिरची, कोबी, वालशेंगा, शेवगा, गाजर, भुईमुग शेंग, वाटाणा, तोतापुरी कैरी, भेंडी, गवार यांची मोठी आवक सुरु झाल्याने दरात मोठी घसरण सुरु झाली आहे. फ्लॉवर, शिमला मिरची, कोहळं, कांदा, बटाटा यांचीही आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. परराज्यातून शहरात मोठ्या प्रमाणावर भाजीपाला येत असल्याने दर कोसळल्याचे सांगितले जात आहे. पालकाच्या दरात घट झाली. कोथिंबीर आणि चवळीच्या दरात काहीशी वाढ झाली आहे. मेथी, शेपू, कांदापात, पुदिना, मुळा, राजगिरा, चुका आणि हरभरा दर मात्र स्थिर आहेत. फळबाजारात बोरं, केळी आणि पपईच्या दरात वाढ झाली. तर, लिंबाच्या दरांत घसरण झाली. अननस, संत्री, मोसंबी, कलिंगड, खरबूज, चिकू, पेरूचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

# जुळ्या मुलांना जन्म दिल्यानंतर आईचा मृत्यू

**पीडीएमसी रुग्णालयातील घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – शहरातील डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात एका गर्भवती महिलेने जुळ्या बाळांना जन्म दिला. परंतू आईचा उपचारादरम्यान आईचा मृत्यू झाला. मृत आईचे नाव गायत्री शरद मरस्कोल्हे (27, पिंपळविहीर) असे आहे. पिंपळविहिर येथील रहिवासी गायत्री यांना प्रसूतीसाठी पीडीएमसी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मंगळवारी, 4 फेब्रुवारी रोजी गायत्रीने जुळ्या बाळांना जन्म दिला. पण यानंतर गायत्रीची तब्येत बिघडली. दरम्यान, गायत्री मरस्कोल्हे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. शरद काशिनाथराव मरस्कोल्हे यांच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# श्वेता सिंघल यांनी विभागीय आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – श्वेता सिंघल यांनी विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार प्र. विभागीय आयुक्त तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडून आज स्विकारला. श्रीमती सिंघल ह्या यापूर्वी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या सचिव म्हणून राजभवन मुंबई येथे कार्यरत होत्या. त्या भारतीय



प्रशासकीय सेवेतील 2009 च्या तुकडीच्या महाराष्ट्र कॅडरच्या अधिकारी आहेत.

# शहिद सागर हिमाणे यांच्या पार्थिवावर लष्करी सन्मानाने अंत्यसंस्कार





**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि.6 )** – भारतीय सैन्यात सिंग्मुल रेजिमेंटमध्ये कार्यरत तिवसा येथील रहिवासी सागर प्रभाकरराव हिमाणे (30) हे बुधवारी ड्युटीवर जात असताना इगतपुरी ते इटारसी दरम्यान झालेल्या रेल्वे अपघातात त्यांना मरण पावले. त्यानंतर आज गुरूवारी सकाळी 8 वाजता शहीद सागर हिमाणे यांच्या पार्थिव तिवसा येथील त्रिमूर्तीनगर परिसरातील त्यांच्या निवासस्थानी आणण्यात आले. तेथून सकाळी 9 वाजता त्यांची अंतिम यात्रा काढण्यात आली व हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर संपूर्ण लष्करी सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पुलगाव येथील सेंट्रल एम्युशन डेपोच्या सैनिक बटालियनने हवेत राऊंड फायर करून शहीद सागर हिमाणे यांना अखेरची मानवंदना दिली. यावेळी मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे व तहसीलदार मयूर काळसे हे देखील उपस्थित होते. तसेच शासन व प्रशासनाच्या वतीने शहीद सागर हिमाणे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त सेच तिवसा पोलिस पथकाने देशाच्या या शूर सुपुत्राला पुष्पचक्र अर्पण करून अखेरचा निरोप दिला.

प्राप्त माहितीनुसार, सिग्निल रेजिमेंटमध्ये कार्यरत असलेले सागर हिमाणे हे एक महिन्याची रजा घालवण्यासाठी आपल्या घरी आले होते आणि रजा संपल्यानंतर ते लेह,लडाखला ड्युटीवर रुजू होण्यासाठी निघाले होते. विशेष म्हणजे सागर हिमाणे रजेवर असतानाच त्यांच्या प्रमोशनची बातमी त्यांना मिळाली. त्यामुळे कुटुंबात आनंदाची लाट उसळली आणि सागर हिमाने हे पदोन्नतीसह ड्युटीवर रुजू होण्यासाठी मोठ्या उत्साहात लेह लडाखला रवाना झाले. मात्र, प्रवासा दरम्यान ते इटारसीजवळ ट्रेनमधून पडले आणि अपघात झाला. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली व त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी पाठवण्यात आले. आज सकाळी अंतिम यात्रा काढल्यानंतर त्यांच्या पार्थिवावर लष्करी सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले.


## उपवनसंरक्षक मेळघाट व्याघ्र प्रकल्प,

**गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा**

**ई-निविदा सुचना क्रमांक- ११ ( सन २०२४-२५ )**

उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र, प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा (दुरध्वनी क्रमांक ०७२२०-२३०२२९) यांचे वतीने खालील कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

**कामाचा तपशिल खालील प्रमाणे :-**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रू. (आकस्मिक खर्च वगळून) | बयाना रक्कम रू. | काम करण्याची कालमर्यादा | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत रू. | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Construction of Borukundi Protection Camp with Chainline Fencing in Forest Comp No. 758 in Bhiroja Beat in Chikhali Round in Tarubanda (WL) Range of Gungamal (WL) Forest Division in Melghat Tiger Reserved. | १४४९६९९ | १४५०० | करारनाम्याचे दिनांकापासून ९० दिवसाचे आत | ५९०/- | अमरावती जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता |

**ई-निविदा वेळापत्रक :-**

१. ऑनलाईन निविदा विक्री करणे व स्विकृती दिनांक ०६-०२-२०२५ सकाळी ११.०० वा. ते दिनांक १२-०२-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत राहिल.

२. ऑनलाईन तांत्रिक निविदा उघडणे दिनांक १३-०२-२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. (शक्य झाल्यास)

**टिप :-**

१. निविदेतील अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये www.mahatenders.gov.in व www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. निविदा शक्य झाल्यास दिनांक १३-०२-२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र, प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल. तथापि निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा, यांनी राखून ठेवला आहे.

३. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

४. निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in व वनविभागाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in वर दिनांक ०६-०२-२०२५ ला सकाळी ११.०० वाजेपासून पहावयास मिळेल.

**दिव्यभारती एम. ( भा.व.से. )**
**उपवनसंरक्षक**
**मेळघाट व्याघ्र प्रकल्प,**
**गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा**

**वि.मा.का./अम./जाही./१११२/२०२४-२०२५**



## ग्रामपंचायत कार्यालय, धुरळघाट रोड. पं.स. धारणी जि. अमरावती.

निविदा सूचना क्रं. ०१/दि.२९/०१/२०२५

**ग्राम पंचायत धुरळघाट रोड पं.स. धारणी जि. अमरावती. द्वारे विविध योजनेअंतर्गत खालील विकासात्मक कामे करीता बी-१ पध्दतीने निविदा नोंदणीकृत कंत्रांटदाराकडून मागविण्यात येत आहे. इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदारांनी आपली निविदा दिलेल्या मुदतीच्या आत सादर करावी .**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फी | अनामत रक्कम | योजनेचे नाव | सन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती कामे | २ लक्ष रुपये | २०० रुपये | २००० रुपये | १५ वित्त आयोग | २०२४-२५ |
| २ | सार्वजनिक इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टींग करणे | १ लक्ष २१ हजार रुपये | २०० रुपये | २००० रुपये | | |
| ३ | जि.प. शाळा येथे शौचालय बांधकाम करणे. | २ लक्ष रुपये | २०० रुपये | २००० रुपये | | |
| ४ | सी.सी. नाली बांधकाम | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| ५ | आंगणवाडी स्वयंपाक शेड बांधकाम | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| ६ | जि.प. शाळा रंगरंगोटी करण व दुरुस्ती करणे. | १ लक्ष ८० हजार रुपये | २०० रुपये | २००० रुपये | | |
| ७ | आंगणवाडी दुरुस्ती | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | ५% पेसा निधी | २०२४-२५ |
| ८ | कॉंक्रीट नाली बांधकाम | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| ९ | सार्वजनिक जागेवर वृक्षांना तार कुंपन | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |

**अटी व शर्ती,**

१. निविदा प्रसिध्द करणे. दि.०७/०२/२०२५
२. निविदा मिळणे व स्विकारणे, दि. ०८/०२/२०२५ ते १६/०२/२०२५ पर्यंत
३. निविदा उघडणे, दि. १७/०२/२०२५ शक्यतो.
४. सर्व नियम व अटी ग्रा.प. नोटीस बोर्डवर पहावयास मिळतील.
५. निविदा दोन लिफाफा पध्दतीने पुर्ण भरलेली मुदतीच्या आत स्विकारल्या जाईल.
६. निविदा स्विकारणे किंवा रद्द करणे ग्रा.प. कार्यालय धुरळघाट रोड यांनी राखुन ठेवले आहे.

सरपंच / सचिव
ग्राम पंचायत धुरळघाट रोड


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शिक्षण मंत्र्यांच्या ताफ्यावर तूर, कापूस फेकला

## शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू होते आंदोलन



## ताफा कार्यालयासमोरून जात असतांना घडला प्रकार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 6)-** सोयाबीन, तूरीसह शेतमालाला भाव मिळावा, या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून या कार्यकर्त्यांनी गुरूवारी दुपारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. यादरम्यान शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या वाहनांचा ताफा जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून जात असताना संतप्त शिवसैनिकांनी त्यांच्या वाहनांच्या दिशेने तूर आणि कापूस फेकला.



ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहचून ठिय्या आंदोलन केले. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या दरम्यान ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये बाचाबाची देखील झाली. शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पराग गुडधे हे कार्यकर्त्यांस जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार उघडून आत शिरले. त्यांनी सोबत सोयाबीन, तूर आणि कपाशी आणली होती.

दरम्यान, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित आढावा बैठकीला उपस्थित राहण्यासाठी जात असताना त्यांच्या ताफ्यावर तूर, कापूस फेकण्यात आला. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. सोयाबीन, कापूस, तुरीला बाजारात हमीभावापेक्षा कमी दर मिळत असताना, शेतमालाच्या खरेदीची व्यवस्था सरकारने केली नाही. निवडणुकीच्या दरम्यान आश्वासने देण्यात आली, त्याची पूर्तता अद्याप सरकारने केलेली नाही, असा आरोप शिवसैनिकांनी केला.

नाफेडच्या दोन्ही यंत्रणांकडे नोंदणी केलेल्या सोयाबीन खरेदीसाठी सरकारने 6 फेब्रुवारी ही मुदत दिली आहे. पण, नोंदविलेल्या दीड हजार शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या खरेदीचे आव्हान आहे. अजूनही शेतकऱ्यांकडील पूर्ण सोयाबीनची खरेदी होऊ शकलेली नाही. बाजारात सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये रोष आहे. शेतमालाला योग्य भाव मिळावा, यासाठी आंदोलन करण्यात येत असल्याचे शिवसैनिकांनी सांगितले.

### दोन्ही सेनागटाचे कार्यकर्ते आले समोरासमोर

यावेळी शिवसेना शिंदे गट व शिवसेना ठाकरे गट या दोन्ही गटाचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने चांगलाच वाद निर्माण झाला होता. मात्र परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वीच पोलिस कुमक आली व पोलिसांनी योग्यरित्या परिस्थिती हाताळल्याने पुढील प्रसंग टळला.



# जीबीएस आजाराविषयी जिल्हा आरोग्य विभाग अलर्ट

## मनपा आयुक्त यांनी घेतली जम्बो बैठक



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.6 ) -** महानगर पालिकेच्या वतीने शासनाच्या आरोग्य विभागाच्या मार्गदर्शन सूचनांच्या अनुषंगाने मंगळवारी गुलेन बॅरी (जीबीएस)आजाराबाबत मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेत महानगर पालिकेत जेम्बो बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सचिन कलंत्रे यांनी पशू विभाग, आरोग्य विभाग, जिल्हा प्रयोग शाळा, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य विभाग व खाजगी रुग्णालय यांना निर्देश दिले की, कोणत्याही रुग्ण हा जीबीएस आजाराचे लक्षण दिसत असेल, तर तत?काळ सार्वजनिक आरोग्य विभागशी संपर्क साधावा तसेच अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सुद्धा आपल्या आरोग्य केंद्रात अतिसार, हाता पायात मुंग्या येणे बधीर होणे असे लक्षणे आढळल्यास नजीकच्या डॉक्टरांशी संपर्क साधावा असे सांगितले. डॉ. विशाल काळे यांनी सुद्धा आजारा संदर्भात शहरात कुठेही लक्षण दिसून आल्यास, साथरोग कक्षाची संपर्क करावा असे कळविले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौदले यांनी सांगितले की, जिल्ह्यात निदान झालेले अजून रुग्ण नसून उपाययोजना जिल्हा सामान्य रुग्णालय येथे सुखसोयी उपलब्ध करून दिली आहे. अशी माहिती दिली. डॉ. किशोर इंगोले अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी सुद्धा घाबरण्याचे कारण नसल्याचे सांगितले.

डॉ. रुपेश खडसे यांनी ह्या जम्बो बैठकीचे आयोजन करून जनजागृती व्हावी व जनतेमध्ये निराशेचे वातावरण होऊ नये व सर्व विभाग जिबीएस आजारासाठी लढण्यास तयार आहे. ह्या उद्देशाने आढावा चर्चा घेण्यात आली. या महत्वाच्या बैठकीत डॉ. संदीप पाटबागे. डॉक्टर इन्चार्ज यांनी सर्व वैद्यकीय अधिकारी यांना रुग्णाची काटेकोर तपासणी करावी, असे निर्देश दिले.

डॉ. सचिन बोंद्रे यांनी पशू व पोल्ट्री फॉर्ममधून हा आजार होत नसून अश्या मार्गदर्शन सूचना पशू विभागाकडून आल्या नसल्याचे सांगितले. बैठकीत शहराची रॅपिड टीम तयार करण्यात आली. यामध्ये बालरोग तज्ञ, न्यूरोलॉजिस्ट फिजीशियन, माणसतज्ञ, वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकिय अधिकारी, प्रयोगशाळा तज्ञ साथरोग नियंत्रण अधिकारी, अन्न व औषध यांचे अधिकारी अशी टीम बनवण्यात आली. या बैठकीत डॉ. स्वाती कोवे, डॉ. पौ र्णिमा उघडे, डॉ. निगार खान, डॉ. मानसी मुरके, डॉ. आकिब खान, डॉ. अजय जाधव, देवेंद्र बायकर, डॉ. वैशाली क ावरे, डॉ. जौशफा अलमास खान व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तसेच महात्मा फुले जन आरोग्य च्या अंकिता मतले यांनी जीबीएसचे उपचारसाठी पॅकेज असल्याचे सांगितले.

# नाविण्यपूर्ण सूचनांची राज्यव्यापी अंमलबजावणी

## शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 6) -** उपक्रमशिल शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रात प्रदिर्घ सेवा देणाऱ्यांकडून नाविण्यपूर्ण सूचना प्राप्त होत आहेत. प्रामुख्याने शासकीय शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी आलेल्या सूचनांची राज्यव्यापी अंमलबजावणी जाणीवपूर्वक करण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

जिल्हा नियोजन भवनात शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा आढावा आणि उपक्रमशिल शिक्षकांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, विभागीय मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, शिक्षण उपसंचालक निलिमा टाके आदी उपस्थित होते. भुसे यांनी, विद्यादानाचे कार्य करणारे शिक्षण हे मानबिंदू आहेत. असंख्य अडचणी आणि समस्यांचा सामना करीत शिक्षक नाविण्यपूर्ण उपक्रम राबवित आहेत. शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे कमी करण्याबाबतही समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षकांना येणारे छोटे प्रश्न येत्या काळात सुटलेले असतील. शिक्षक, संस्थाचालक यांच्या अडचणींची नोंद घेण्यात आली आहे. याबाबत येत्या काळात निर्णय घेण्यात येतील. शाळा भेटीतून स्वच्छता, पोषण आहार आदीबाबत कार्यवाही व्हावी, अनूचित प्रकार घडल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

त्यासोबतच शिक्षकांनी प्रतिकुल परिस्थितीमध्ये ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. याची दखल घेऊन चांगले कार्य करणाऱ्यांचे कौतुक करण्यात येईल, असे ही ते म्हणाले.

# अकोला येथील दुचाकी चोराकडून 4 वाहने जप्त

## येवदा पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 6) -** येवदा पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या लोतवाडा परिसरातून चोरीला गेलेल्या दुचाकी प्रकरणी पोलिसांनी अकोल्यातून एका दुचाकी चोराला अटक केली आहे. त्याच्याकडून चार वाहने जप्त करण्यात आली आहेत. येवडा पोलिसांनी ही कारवाई केली.

लोटवाडा येथील रहिवासी रघुनाथ हरिभाऊ वाकोडे हे 4 फेब्रुवारी रोजी त्यांच्या दुचाकी क्रमांक एमएच 27 बीएन 4887 वर शेतात गेले होते. जिथे त्यांनी मुख्य रस्त्यावर दुचाकी उभी केली होती. त्यानंतर काही वेळांनी त्यांना दुचाकी दिसली नाही. त्यामुळे दुचाकी अज्ञात व्यक्तीने चोरल्याचे निर्देशनास आले. या प्रकरणाबाबत रघुनाथ यांनी येवदा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाचा तपास करत असताना, पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की आरोपी सचिन उर्फ वकिल खंडुजी वाघमारे हा चोरीच्या दुचाकीवरून फिरत आहे. पोलिसांनी तात्काळ मुख्य रस्ता अडवला आणि त्याला अटक केली.

चौकशीदरम्यान सचिनने चोरीची कबुली दिली. आरोपींकडून चार दुचाकी जप्त करण्यात आल्या. ही दुचाकी कुठून चोरीला गेली याचा तपास पोलीस करत आहेत. वरील कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक देशमुख, पोलीस अधिकारी पंकज नळकांडे, प्रवीण वानखडे, सुमेध गवई, आशिष भुते, ज्ञानेश्वर कोळी यांनी केली.

# धारणी येथे रविवारी विधी सेवा महाशिबीर

## शासकीय योजनांचा महामेळावा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 6)-** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा. मुंबई यांच्या वतीने धारणी येथील जिल्हा परिषद शाळेचे मैदानावर विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दि. 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

महामेळाव्याला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती अभय ओक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे, उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूरचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, पालक न्यायमूर्ती वृषाली जोशी उपस्थित राहणार आहेत

महामेळाव्यामध्ये वंचित, दुर्बल घटक, कामगार, दिव्यांग, महिला आदींना विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली जाणार आहे. तसेच इतर शासकीय विभागाच्या योजनांची माहिती आणि त्यांच्या समस्या जाणून कायदेशीर मार्गदर्शन करण्यात येणार आहे तसेच गरजू आणि पात्र नागरिकांना कल्याणकारी योजनांचा लाभ दिल्या जाणार आहे. यात 32 हजार लाभार्थी निवडण्यात आले असून रविवारी दिड हजारावर नागरिकांना लाभ देण्यात येणार आहे.


शिबीरामध्ये विविध शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, तसेच कायदेतज्?ज्ञांनाचा सहभाग राहणार आहे. सोबतच मोफत कायदेविषयक सल्ला, इतर योजनाचे सामाजिक कल्याणकारी फायदे आणि विविध कायदेशीर हक्कांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नागरीकांनी विधी सेवा आणि शासकीय योजनाचा लाभ घेण्याकरीता मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुधाकर यार्लगड्डा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव मंगला कांबळे यांनी केले आहे.

# शंकरपट हे शेतकऱ्यांच्या मेहनतीचा व बैलांवरील प्रेमाचा सन्मान

**दोन्ही गटात 150 जोड्यांचा सहभाग**

- श्री. संत बेंडोजी महाराज संस्थानचे विश्वस्त प्रविण घुईखेडकर यांचे प्रतिपादन
- घुईखेड मध्ये जंगी शंकरपटाचा उत्साहात सुरूवात, प्रेक्षकांची तुफान गर्दी





**महासागर प्रतिनिधि**
**चांदुर रेल्वे,( दि.6 )-** शंकरपट ही स्पर्धा केवळ मनोरंजन नाही तर त्यांच्या मेहनतीचा व बैलांवरील प्रेमाचा सन्मान आहे असे प्रतिपादन माजी जि.प. सदस्य तथा श्री संत बेंडोजी बाबा संस्थानचे विश्वस्त प्रविण घुईखेडकर यांनी केले. घुईखेड येथे संत बेंडोजी महाराजांचा संजिवन समाधी सोहळा सुरू याच दरम्यान सदर शंकरपटाचे आयोजन 6 व 7 फेब्रुवारीला करण्यात आले आहे. या शंकरपटाच्या उद्घाटनाप्रसंगी गुरूवारी (ता. 6) ते बोलत होते.

श्री बेंडोजी बाबा संस्थान व गावकरी मंडळी घुईखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जंगी शंकरपटाचे दोन गटात आयोजन करण्यात आले आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड गावातील बेंडोजी बाबा एम.सी.व्ही.सी. महाविद्यालयाच्या मागील मैदानावर शंकरपटाचे आयोजन करण्यात आले असुन यात दोन लाख रुपयांच्या जवळपास बक्षिसांची लयलुट होणार आहे. या शंकरपटाचे उद्घाटन संस्थानचे विश्वस्त प्रविण घुईखेडकर यांच्या हस्ते बैलजोडी पुजनाने झाले. यावेळी बेंडोजी बाबा विद्यालयाचे प्राचार्य सुमंत अंबुलकर, पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. सातव, नंदकिशोर काकडे, कैलास सावनकर, अ.भा. ग्रामिण पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, शरद गुल्हाणे, किसन शिसोदे, अंबादास निम्रट, गजानन भालेवार राजाभाऊ देशमुख, राजाभाऊ शेकळे, तुषार बनकर आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेत नागपुर, यवतमाळ, अमरावती व वाशिम जिल्ह्यातून क गटात 100 जोड्यांनी सहभाग घेतला तर अ गटात 50 जोड्यांनी सहभाग घेतला.

या शंकरपटाचा पहिला दिवस गव्हाफरकाडे येथील किशोर लाकडे यांची रावन - फायर जोडी (6.39 सेकंद), धामणगाव येथील डॉ. आशिष सालनकर यांची जोडी (6.52 सेकंद) व यवतमाळ येथील यारी दोस्ती ग्रुपची काजल - किस्मत जोडी (6.90) यांनी गाजविला. शुक्रवारी उर्वरित जोड्यांची स्पर्धा होणार आहे.

या शंकरपटाच्या यशस्वीतेकरिता शंतनु काकडे, वैभव काकडे, अंशुमन काकडे, चरणदास खरासे, मनोहर कोल्हे, अनुराग वानखडे, विशाल शेंडे, सचिन पवार, जिवन हेले, प्रणय सहारे, रूपेश घड्डीनकार, विजय मेश्राम, मुकुंद काकडे यांसह घुईखेडवासी अथक परिश्रम घेत आहे.

### शंकरपटाची प्रक्रिया

शर्यतीसाठी मैदानावर विशिष्ट अंतरावर दोन खांब लावले जातात. त्यावर धागे बांधलेले असतात. पहिला धागा तोडला की, वेळ मोजणारे घड्याळ सुरू होते आणि दुसरा धागा तोडला की वेळ थांबते. या दरम्यानची वेळ नोंदवली जाते. ज्या जोडीने सर्वात कमी वेळात अंतर पूर्ण केले ती जोडी विजयी ठरते.

### रविवारी मंदिरात कळस स्थापना

श्री संत बेंडोजी महाराज संजीवन समाधी सोहळ्याच्या अंतिम दिवशी रविवार, 9 फेब्रुवारीला होमहवन, कळस स्थापना व गोत आंबिल महाप्रसादाचे आयोजन सुध्दा करण्यात आले आहे. कळसाकरिता गावातील सर्वधर्मीय नागरिकांनी देणगी देऊन यात सहभाग घेतल्याची माहिती संस्थानचे विश्वस्त प्रविण घुईखेडकर यांनी दिली. त्यामुळे हा सोहळा सर्वधर्मीय ऐतिहासीक सोहळा होणार असल्याचे नागरिक सांगत आहे.

# इयत्ता पाचवी अन् आठवीच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिकांचे होणार जतन

## पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांसाठी ढकलपास पद्धत आता कायमची बंद




**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट, (दि. 6)-** इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याची पद्धत आता बदलली आहे. इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट पास करणे बंद झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा पारदर्शकपणे घेतली का, उत्तरपत्रिकांची तपासणी व गुणदान बिनचूक आहे की नाही?, याची पडताळणी आता 'डायट'चे अधिकारी व शिक्षणाधिकारी करणार आहेत. त्यासाठी सर्व शाळांना पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका वर्षभर जनत करून ठेवाव्या लागणार आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या माध्यमातून आता पाचवी व आठवीच्या परीक्षांवर लक्ष ठेवले जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील शाळांमधील या इयत्तेतील विद्यार्थ्यांची पारदर्शकपणे परीक्षा घेतली जाते का?, याची पडताळणी प्राथमिक शिक्षणाधिकारी व जिल्हा शैक्षणिक प्रशिक्षण संस्थेच्या (डाएट) माध्यमातून होणार आहे. काही दिवसांपूर्वी पाच ते 16 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसंदर्भातील अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात इयत्ता पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना अंक ओळख, वजाबाकी, भागाकार देखील येत नसल्याची बाब समोर आली.

अनेकांना वाचायला देखील जमत नसल्याचे या सर्व्हेतून उघड झाले. दुसरीकडे सरकारी शाळांमधील प्रवेश देखील गुणवत्तेच्या कारणामुळे घटल्याची बाब स्पष्ट झाली. शाळांची गुणवत्ता वाढावी, विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या इयत्तेत पुढे जाताना त्यांच्या बौद्धिक पातळीचा विचार व्हावा, यासाठी आता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ढकलपास पद्धत करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आता पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांची परीक्षा पारदर्शकपणे घेण्याचे नियोजन 'एससीईआरटी'कडून करण्यात आले आहे.

### अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी दोन संधी

इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांना स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार करून दिल्या जातात. एप्रिलमध्ये या विद्यार्थ्यांची परीक्षा होईल. त्यात अनुत्तीर्ण झालेल्यांची पुढे मे-जून महिन्यात फेरपरीक्षा घेतली जाणार आहे. याही परीक्षेत अनुत्तीर्ण झालेला विद्यार्थी त्याच वर्गात राहणार असून त्याला पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार नाही. त्यांची परीक्षा पारदर्शकपणे घेण्यात आली की नाही, याची पडताळणी प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकांच्या आधारे केली जाणार आहे.

### प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिकांचे जपून ठेवाव्या लागतील

इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचा प्रकार आता बंद झाला आहे. मागच्या वर्षी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या दोनअंकी आहे. आता इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा झाल्यावर त्यांची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका शाळांनी जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. त्या उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिकांची फेरतपासणी शिक्षणाधिकारी व जिल्हा शैक्षणिक प्रशिक्षण संस्थेचे (डाएट) अधिकारी करतील. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यान तसे आदेश दिले आहेत.